**क्रमांक.क्रा.4/प्र.क्र.2681/भाग-3/1701 ते 1783.**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे 1**
**दि- 21/06/2001**

**परिपत्रक -**

**विषय-** दस्तलेखनिकाचा नवीन परवाना देणेबाबत व प्रतिवर्षी परवाना नुतीनकरण् करणेबाबत सुधारीत नियम तयार करणे अथवा नियमात बदल करणे.

भारतीय नोंदणी कायदा 1908 चे कलम -69 (1) मध्ये अंतर्भुत असलेल्या तरतुदीनुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट राज्य, पुणे यांना सर्व नोंदणी कार्यालयांवर नियंत्रण् ठेवण्याचे अधिकार आहेत. तदनुसार दस्तलेखनीक यांच्यावरही नियंत्रण् ठेवण्यात येते.या अनुरोधाने वेळोवेळी नियमात बदल करणेबाबत कार्यवाही करावी लागते.या अनर्षगाने जनहिताचा द्ष्टीने जे उमेदवार दस्तलेखनिकाचे काम करण्यात उत्सुक आहेत.त्यांना नवीन परवाना देणेबाबत व त्यांच्या काम करण्यांच्या पध्दतीबाबत खालीलप्रमाणे सुधारीत नियम दि.पासून अंमलात आणण्यात येत आहेत.

1/- परवानाधारक दस्तलेखनीकाशीवाय दुय्यम निबधक यांच्या कार्यालयांच्या आवारात अथवा महसूल कार्यालयांच्या आवारात इतर लेखनिकांस बसता येणार नाही.

2/- ज्या इसमाकडे दस्तलेखनीकाचा परवाना नाही, त्यांना संबंधीत पक्षकारांबरोबर दुय्यम निबधक यांच्या कार्यालयांत, स्वःताच्या खाजगी कामाखेरीज जाण्यास मनाई आहे.

3/- नवीन परवाणे देणव्याचे अधिकार जिल्ह्याधिकारी यांना आहेत. वर्षाच्या जानेवारी महिन्यांत सदर परवान्यांचे नुतीनीकरण करावयाचे आहे. संबधित दुय्यम निबधक यांची शिफारस व तपासणी अहवालाच्या आधारे परवान्याचे नूतीनीकीरण करण्याचे अधिकार सह जिल्हा निबधक यांना आहेत.

4/- राज्यांच्या साधन संपत्तीत वाढ करण्यांच्या द्ष्टीने व सन 1993 पासून परवाना फी व मध्ये वाढ करण्यात न आल्यामुळे दस्तलेखनीक यांचे नवीन परवाना व नूतीनीकीरण फी मध्ये खालील प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

अ) मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील महानगरपलिकेमध्ये अंतर्भत असलेल्या कार्यक्षेत्रातील

उमेदवारास दस्तलेखनिकांचा नवीन परवाना देण्यासाठी रक्कम रु 1.000/- व परवाना नुतनीकरण करणेसाठी रक्कम रु 500/- फी आकारण्यात यावी.

ब)पुणे,सोलापूर,कोल्हापूर,सांगली मिरज कुपवाड, नाशिक, नागपूर,औरंगाबाद, अमरावती, उल्हासनगर, कल्याण व पिपरी-चिचवड ,पुणे येथील महानगरपलिकेमध्ये अंतर्भत असलेल्या कार्यक्षेत्रातील उमेदवारास परवाना देण्यासाठी रु 750 /- व परवानाचे नुतीनिकीरणासाठी रक्कम रु 400/- फी आकारावी.

क) राज्यातील इतर सर्व नगरपालिकेमध्ये अंतर्भूत असलेल्या कार्यक्षेत्रातील उमेदवारास दस्तलेखनिकांचा नवीन परवाना देण्यासाठी रक्कम रु 500/- व परवाना नुतनीकरण करणेसाठी रक्कम रु 300/- फी आकारण्यात यावी.

ड) उर्वरीत सर्व तालुक्यामध्ये जेथे नगरपालिका नाही. अशा ग्रामीण विभागात नवीन दस्तलेखनिकांचा परवाना देण्यासाठी रक्कम रु 300/- व परवाना नुतनीकरण करणेसाठी रक्कम रु 200/- फी आकारण्यात यावी.

5/- दस्तलेखनिकांचा नवीन परवाना देण्यासाठी उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

अ) मराठी व इंग्रजी टंकलेखक येणे आवश्यक आहे. अर्जासोबत प्रमाणपत्रे जोडावीत.

ब) हस्ताक्षर सुवाच्च व भाषा शुध्द असावी.

क) शिक्षण कमीत कमी 12 वी पास असावे.

ख) वर्तणूक चांगली असलेबाबत पोलिस दाखला सादर करणे आवश्यक आहे.

इ) वय कमीत कमी 18 वर्ष पुर्ण व जास्तीत जास्त 30 वर्ष पुर्ण असावे.

फ) संगणकाबाबत ज्ञान असल्यास तसे मान्यता प्राप्त संस्थेचे प्रमाणपत्रे जोडावीत.

ग) ज्या उमेदवारांने सेवायोजना कार्यालयात नांव नोंदविलेले आहे त्यांचा पुरावा अर्जासोबत जोडावा.

**टीप - सदर नियम नवीन परवाना धारकास लागू असतील. यापूर्वीच्या परवानाधारकास वरील नियम लागू नाहीत.परवाना नुतीकरण्यांच्या बाबतीत नियम क्रमांक 3 व बाबतीत नियम क्रमांक 4 लागू करावेत.**

6) /- जाहीराती करिता होणारा कार्यालयांनी खर्च टाळण्यांच्या द्ष्टीने जिल्हा्धिकारी यांना दस्तलेखनिकांची आवश्यकता भासत असल्यास तशी सुचना (NOTICE) निर्गमीत करुन ती आपल्या कार्यालयांतील दर्शनी भागावरील सुचना फलकावर लावावी अथवा चिकटण्यात यावी जेणेकरुन उत्सूक उमेदवारांना माहीत होईल.यास्तव सदर सुचनेची प्रत तहसिलदार यांच्या कार्यालयाकडे पाठवून त्यांनी त्यांचे कार्यालयांतील दर्शनी भागातील सुचना फलकावर उत्सूक उमेदवारांना माहीतीसाठी लावावी.अथवा चिकटविण्यात यावी. सदर सुचनेनुसार उमेदवारांच्या प्राप्त झालेल्या एकूण अर्जावरुन जिल्हा्धिकारी तथां जिल्हा निबधक यांनी त्यांच्या स्तरांवर सर्व बाबीची पुर्तता झालेली असेल तर योग्य त्या निवडीची पध्दत अंवलबून अर्जदारास दस्तलेखनिकांचा नवीन परवाना देण्यात यावा.

7/- प्रत्येक तालुक्यात नोंदविण्यात येणा-या दस्तऐवजांची वार्षीक संख्या विचारात घेऊन त्या भागात आवश्यक तेवढेच दस्तलेखनिकांचे नवीन परवाने देण्यात यावेत.मात्र प्रत्येक तालुक्यात कमीत कमी 2 दस्तलेखनीक असावेत.

8/- ज्या दस्तलेखनिकांचे वय 60 वर्षे पुर्ण झालेली आहेत की त्यांचे परवाने रद्द करण्यात यावे.

9/- खालील दर्शविल्याप्रमाणे दस्तलेखनिक यांचे कुटुबांतील इसामासाठी/ व्यक्तीसाठी अनुकंपा तत्वावर दस्तलेखनिकांचे नवीन परवाने आरक्षित करुन त्यांना नवीन परवाने देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करावी.

अ) वयाची 60 वर्षे पुर्ण झालेली दस्तलेखनिक

ब) कार्यारत असताना शारिरीक विकलांगत्व आलेले दस्तलेखनिक.

क) कार्यारत असताना वयाची 60 वर्षे पुर्ण होण्यासाठी मयत झालेले दस्तलेखनिक.

ड) जिल्हा निबधक यांचेकडून स्वःताचा परवाना रद्द करुन घेऊन अर्जानुसार मुलास/ मुलीस नवीन परवाने मिळणेसाठी जिल्हा निबधक यांचेकडे रितसर अर्ज दाखल करुन विनंती करणार दस्तलेखनिक.

10/- तथापि वर नमूद केलेप्रमाणे त्याचे कुटुबांतील व्यक्ती/ इसम शासकीय सेवेत अगर कोणत्याही संस्थेत कार्यरत नसावेत. भारतीय त्यांचप्रमाणे एकाच कुटुबांतील दोन व्यक्ती/इसम परवानाधारक नसावेत.

11/- प्रत्येक दस्तलेखनिकाला नोंदणी अधिनियम 1908 व महाराष्ट्र नोंदणी नियमावली 1961 व मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे तसेच वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमांचे कामापुरते ज्ञान असणे आवश्यक आहे.

12/- प्रत्येक परवानाधारक दस्तलेखनिकाला आंगठे उमटविण्याचे 2 दिवसाचे प्रशिक्षण संबधित दुय्यम निबधक यांनी दयावे.या कालावधीमध्ये दस्तऐवज लिखाईबाबतची आवश्यक माहीती दुय्यम निबधक यांनी दस्तलेखनिकाला दयावी.आंगठे उमटविण्याबाबतचे प्रातक्षिक दुय्यम निबधक यांनी करुन दाखववे.व त्याप्रमाणे दस्तलेखनिकाकडून प्रात्यक्षिक करुन ध्यावे.या वास्तव आंगठे घेताना वापरण्यात येणा-या साहित्यांबाबत व दस्तऐवज लिहण्याकरता उच्च् प्रतिचा कागद वापरण्यातबाबत संबधित दुय्यम निबधकांनी योग्य मार्गदर्शन करावे.

13/- वरील नियम क्रमांक 12 प्रमाणे प्रशिक्षण घेणेसाठी दस्तलेखनिकाकडून प्रशिक्षण घेणेपुर्वी रु.50/- फी आकारण्यात यावी.

14/- सदर प्रशिक्षणबाबत आकारण्यात आलेली फी महाराष्ट्र नोंदणी नियमावली 1961 चे नियम 42 मध्ये अंतर्भुत असलेल्या तरतुदीनुसार विवरणपत्र ‘आर’ प्रमाणे दुय्यम निबधक यांनी पावती दयावी.व सदर रक्कम 030 नोंदणी फी व मुद्रांक शुल्क वा लेखाशिर्षाखाली शासन जमा करावी.

15/- दुय्यम निबधक यांच्या कार्यालयांच्या तपासणीच्या वेळी त्या दुय्यम निबधक कार्यालयांच्या आवारातील दस्तलेखनिकाची तपासणी मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांनी करावी. व अंगठे उमटवण्यामध्ये व इतर कामामध्ये निपुण वाटल्यास कार्यालयीन

प्रमाणात देण्यात यावे. असे प्रमाणात देताना प्रशिक्षण फी देण्यात आलेला उल्लेख सदर प्रमाणपत्रात करावा.जर असे प्रमाणात हरवले.खराब झाले किवा जीर्ण झाले तर नवीन प्रमाणपत्र् मिळणेबाबत रुपये -20/- फी भरुन दुय्यम निबंधक यांचे मार्फत अर्ज करावा व सदर फी दुय्यम निबंधक यांनी  वरील नियम 14 प्रमाणे शासन जमा करावी. दुय्यम निबंधक यांचेकडील चौकशी नंतर नोंदणी महानिरीक्षक यांनी नवीन प्रमाणपत्र दयावे. व त्यांची पावती संबधित दुय्यम निबंधक यांनी दयावी.

16/-प्रत्येक परवानाधारक दस्तलेखकाने दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,यांचेकडून दस्तऐवज लिखाईबाबत, फी आकारणेबाबत,आंगठे घेण्याबाबत, दस्तऐवजाचा प्रारुपाबाबत किंवा त्यांच्या वागणुकीबाबत ज्या सुचना/ आदेश देण्यात येतील व त्यांचे अचुक पालन करावे.तसे न केल्यांचे निदर्शनास आल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तुणूक  तथा गैरव्यवहार केल्यास अथवा निदर्शनास आल्यास/ सिध्द  झाल्यास परवाना रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / जिल्हा निबंधक यांना राहतील.

17/- राज्यातील दस्तलेखनिकाचे लिहिण्यावळीचे दर या कार्यालयांचे आदेश क्र.का 4/प्र.क्र2681/ भाग-2/

दस्तलेखनिक दर  /4015-4380,दि.26/9/1997.अन्वेय निश्चित केलेप्रमाणे संबधित पक्षकारांकडून घेण्यात यावे.

18/-वरील नियम क्र.17 मध्ये निश्चित केलेल्या लिहिण्यावेळीचे दरपत्रक स्पष्ट व सुवाच्च अक्षरात स्थानिक भाषेत दस्तलेखनिक बसतात .त्या ठिकाणी व दुय्यम निबंधक यांचे दालनात सर्वांना दिसेल असे लावावे.

19/- दस्तऐवज लिहिण्यावळची रक्कम निश्चित केलेल्या दराप्रमाणे स्विकारुन रक्कम स्विकारल्याबाबतच्या पावत्या पक्षकारांना देण्यात याव्यात.

20/- दस्तलेखनिक यांनी केलेल्या कामाची नोंदवही ठेवावी व त्यामध्ये  पक्षकाराचे नाव व पत्ता, दस्तऐवजाचा  प्रकार ,दस्तऐवजातील मालमत्तेची किंमत मालमत्तेचे वर्णन पानांची संख्या,आकारलेली लिहिणावळ फी याबाबतीतला तपशील दररोज लिहावा.सदर नोंदवही व पावतीपुस्तक तपासणीचे अधिकार, दुय्यम निबंधक तहसिलदार किंवा कोणताही तपासणी अधिकार यांना राहील.

21 /- दस्तलेखनिक यांनी लिहिलेल्या दस्तऐवजावर ओळख पटविण्यास किंवा साक्ष देण्यास पात्र राहणार नाही.

22/- दस्तलेखनिक हा दुय्यम निबंधक / तहसीलदार यांनी ठरवून दिलेल्या जागी कार्यालयीन वेळेतच दस्तऐवज लिहिण्याचे काम करु शकेल.

23/- दस्तऐवजलेखकाला जिल्हा निबंधक/जिल्हाअधिकारी यांच्या पुर्वसंमतीखेरीज मदतनीस ठेवता येणार नाही.

24/- हे नियम दुय्यम निबंधक / महसूल अधिकारी यांच्या कार्यालयांच्या आवारात बसणा-या दस्त लेखकाच्या बाबतीतच फक्त लागू असून परवानाधारक नसलेल्या दस्तलेखनिकाने लिहिलेल्या दस्तऐवज दुय्यम निबंधक यांना या नियमाच्या आधारे नाकारता येणार नाही.

**सही - डॉ. नितीन करीर**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**
**महाराष्ट्र राज्य, पुणे,**

**प्रति -**

1) सर्व सह जिल्हा निबधक यांना माहीतीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

2) सह जिल्हा निबधक/जिल्हा अधिकारी यांना माहीतीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.

3) दुय्यम निबंधक,मुंबई/बांद्रा यांना माहीतीसाठी अग्रेषीत.

4) सर्व दुय्यम निबंधक यांना माहीतीसाठी रवाना (सह जिल्हा निबधक ;यांचेमार्फत).

5) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना माहीतीसाठी अग्रेषीत.

6) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी यांना माहीतीसाठी.